MHPU180008542022

## निशाणी क्र. २३ वरील आदेश

(दिनांक २५.१०.२०२३)

१. प्रस्तुत अर्ज वादीने मे. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, दौंड यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक होऊन मौजे कानगांव, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्र. १७२, १७३, १७४/१, १७४/२ व १७५ ची एकत्रीत मोजणी करुन नकाशा व हद्दीच्या खुणा व अतिक्रमीत क्षेत्राच्या मोजमापासह सत्य वस्तुस्थितीदर्शक नकाशा अहवाल मागविणे याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, दावा हा फाळणीबारा करुन मिळणेबाबत व निरंतरच्या मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ हे हजर होऊन त्यांनी आदेश ७ नियम ११ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे व त्यांनी मो.र.क्र. ११६६०/२०२२ प्रमाणे मोजणी केल्याचे कथन केले आहे. वादी यांनी गट क्र. १७४/१ मधील ०० हे. ८० आर. क्षेत्र दि. २३.०५.२०१७ रोजी रजिस्टर दस्त क्र. २४७८/२०१७ प्रमाणे खरेदी केले आहे. प्रतिवादी क्र. १, २ व ४ यांनी त्यांचे मिळकतीचे गट क्र. १७५ मोजणीकामी मा. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, दौंड यांच्याकडे अर्ज सादर केला होता. वादीची मिळकत व गट क्र. १७५ च्या लगत आहे, मात्र वादींना मोजणीबाबत नोटीसा मिळाल्या नाहीत अगर हद्दी कायम केल्या गेल्या नव्हत्या. त्यामुळे वादींनी मोजणीकामी रितसर हरकत अर्ज दाखल केला. मो.र.क्र. ११६६०/२०२२ ची मोजणी मान्य नसल्याचे कळविले. तसेच गटवारी योजनेत काही तांत्रीक चुका झाल्याने व अद्यापपर्यंत गट क्र. १७४/१, १७२, १७३, १७४/२ व १७५ फाळणीबारा झालेला नसल्याने त्यांच्या हद्दी कायम करणेकामी वर नमुद गटांची संयुक्त मोजणी घेणे कायद्याने आवश्यक आहे. मे. कोर्ट कमिशनर मार्फत मोजणी घेऊन सत्य वस्तुस्थितीदर्शक अहवाल नकाशासह मे. कोर्टात येणे आवश्यक आहे. सर्व गटांच्या मोजणीमुळे न्यायदानास मदतच होणार आहे व हद्दी निश्चित होणार आहे. त्यामुळे मे. कोर्टामार्फत उपअधिक्षक, भुमी अभिलेख, दौंड यांची कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणुक करुन गट क्र. १७४/१, १७२, १७३, १७४/२ व १७५ ची एकत्रात मोजणी करुन मोजणी नकाशा व हद्दीच्या खुणा अतिक्रमीत क्षेत्राच्या मोजमापासह नकाशा अहवाल मे. कोर्टात विहीत मुदतीत मागविणे आवश्यक आहे. हद्दीच्या खुणाबाबत वाद निर्माण झाल्यास

शासकीय भुमी अभिलेखामार्फत मोजणी करुन सत्य वस्तुस्थितीदर्शक अहवाल नकाशासह मागविणेचा मे. कोर्टास पुर्ण हक्क व अधिकार आहे. वादी हे योग्य ती फी भरणेस तयार आहे. या सर्व कारणास्तव वादीने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ व ४ यांनी सदर अर्जास जोरदार विरोध करुन त्यांचा जबाब अर्जाच्या पाठीमागे लिहुन दिलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जातील मजकुर खरा व बरोबर नसुन प्रतिवादींना मान्य व कबुल नाही. परंतु कोर्ट कमिशन मार्फत सर्वे क्रमांकामधील सर्व गटांची वस्तुस्थितीचे स्थळ नकाशाप्रमाणे मोजणी झाल्यास न्यायनिर्णय करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी सी.पी.सी. चे आदेश ७ नियम ११ प्रमाणे दिलेला अर्ज नॉट प्रेस करुन म्हणणे दाखल केले आहे. त्यामुळे सदर सर्वे क्रमांकामधील वादी व प्रतिवादी यांच्या दावा मिळकतीची मोजणी करण्यास हरकत नाही. त्यांनी अशी विनंती केली आहे की, वादी यांनी दाखल केलेला अर्ज वस्तुस्थितीच्या परिस्थितीप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे वहिवाटीप्रमाणे क्षेत्राची नोंदीसह क प्रत नकाशा तयार करण्यात यावा या मुद्यावर मंजुर करण्यात यावा.

४. तसेच प्रतिवादी क्र. २, ५ ते १० विरुध्द दावा हा एकतर्फा चालविण्याचा आदेश झालेला आहे.

५. वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस.एन.कामत व प्रतिवादी क्र. १ व ४ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर.एस.घोगरे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

६. अर्ज व जबाब वाचला. वादीने नि. ३ सोबत दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने मो.र.क्र. ११६६०/२०२२ च्या मोजणीकामी लेखी हरकत मा. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, दौंड यांचेकडे दि. ०२.०३.२०२२ रोजी केली होती. प्रतिवादींचा जबाब पाहता त्यांनी वादी व प्रतिवादींच्या दावा मिळकतीची मोजणी करण्यास हरकत नसल्याचे दिसते. वादीचा दावा प्रतिवादी क्र. १ व ४ यांच्या कैफियतीमधील कथन पाहता वादीचे गट क्र. १७४/१ प्रतिवादी क्र. १ व ४ चे गट क्र. १७५ असे आहे. त्यांनी वादीविरुध्द कैफियतीमध्ये मो.र.क्र. ११६६०/२०२२ नुसार गट क्र. १७५ मध्ये उत्तर बाजुने ०० हे. २२ आर. क्षेत्रात अतिक्रमण केल्याचे कथन केले आहे.

त्यास वादीने हरकत घेतल्याचे नि. ३/७ वरील लेखी हरकतीनुसार दिसुन येते. वादी व प्रतिवादींचे हद्दीवरुन वाद असल्याचेदेखील वादीच्या दाव्यातील कथनावरुन दिसुन येते.

७. कोर्ट कमिशनर नेमण्याचा उद्देश म्हणजे विवादातील कोणतीही बाब स्पष्ट करण्याच्या होतुने कोणत्याही खटल्यामध्ये आवश्यक किंवा योग्य असेल तेव्हा आयोग किंवा कमिशनर जारी केला जातो.

८. त्यामुळे वर नमुद कारणे, दाव्याचे स्वरुप, दाव्यात प्रतिवादींविरुध्द केलेली मागणी, तसेच दि.प्र.सं.आदेश २६ नियम ९ यातील तरतुदीनुसार तसेच वादीच्या अर्जातील कथनांत मला तथ्य असल्याचे दिसुन येते. म्हणुन वादीचा अर्ज मंजुर करण्यास पात्र ठरतो. करीता मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज नि. २३ मंजुर करण्यात येतो.

२. मौजे कानगांव, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्र. १७२, १७३, १७४/१, १७४/२ व १७५ ची एकत्रीत मोजणी करण्याकरीता कोर्ट कमिशनर म्हणुन मा. उपअधिक्षक, भुमि अभिलेख, दौंड यांची नियुक्ती करण्यात येते.

३. मा. उपअधिक्षक, भुमी अभिलेख, दौंड यांनी मौजे कानगांव, ता. दौंड, जि. पुणे येथील गट क्र. १७२, १७३, १७४/१, १७४/२ व १७५ यांची एकत्रीत मोजणी करुन नकाशा व हद्दीच्या खुणा व अतिक्रमीत क्षेत्राचे मोजमापासह याबाबतचा सत्य वस्तुस्थितीदर्शक नकाशा तसेच सविस्तर अहवाल न्यायालयात दोन महिन्यांच्या आत सादर करावा.

४. कोर्ट कमिशनर यांनी कमिशनच्या कामाला सुरुवात करण्यापुर्वी वादी व प्रतिवादी यांना तसेच लगत कब्जेदारांना नोटीस पाठवुन मोजणीची पुर्वसुचना द्यावी.

५. वादीने मोजणीचा खर्च करावा. आठ दिवसांत सदरच्या मोजणीचा खर्च नियमाप्रमाणे भुमी अभिलेख, दौंड कार्यालयात भरावा व त्याची पावती सदर प्रकरणात दाखल करावी.

६. कमिशन रिट या आदेशासह प्रोसेस फी भरलेनंतर त्वरीत पाठवावी.

७. दोन्ही पक्षांनी व त्यांच्या विधीज्ञांनी याची नोंद घ्यावी.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.10.27 10:52:24 +0530

[ **श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल** ]
दिवाणी न्यायाधीश क. स्तर (न्या.क्र. १),
ता. दौंड, जि. पुणे.

ठिकाण– दौंड
दिनांक– २५.१०.२०२३

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file of Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | P. D. Jagatap. |
| Name of the Court | :- | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>C.J.J.D. & J.M.F.C. (Court No. 01),<br>Tal. Daund, Dist. Pune. |
| Order date | :- | 25.10.2023. |
| Order singed by the<br>Presiding Officer on | :- | 25.10.2023. |
| Order uploaded on | :- | 27.10.2023. |